महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई

नोटीस क्र :—६३/एन्/२०२१ गुन्हा नोंद क्र :— ४८६/२०२०.
पोलीस ठाणे पवई

प्रविण बालकिशन सुद ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार, ... गैरअर्जदार.
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(पवई पोलीस ठाणे)

निशाणी क्र.—१ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज पवई पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४८६/२०२० कलम ३९२ सह ३४ भा.द.वि. संहितामध्ये जप्त वस्तू सॅमसंग गॅलेक्सी नोट १० मोबाईल फोनचा अंतरिम ताबा मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. जप्त मुद्‌देमाल हा अर्जदाराच्या मालकीचा असल्याचे त्याचे म्हणणे आहे. अर्जदाराकडे जप्त मुद्‌देमालाची पावती आहे. अशी कथने करून अर्ज मंजूर होण्याची विनंती अर्जदाराने केलेली आहे. अन्वेषन अधिकारी व शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. अर्ज मंजूर होण्यास त्यांचा आक्षेप नाही. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने स्वत:चे शपथेवर प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.२) आणि जप्त मोबाईल फोनची पावती (निशाणी क्र.४) दाखल केलेले आहे. तपासी अंमलदार आणि सरकारी वकीलांनी मुदद्‌माल अर्जदारास परत करण्यासाठी हरकत घेतली नाही. अन्वेषन अधिका—याच्या म्हणण्याप्रमाणे आरोपीकडून वरील नमूद मुद्‌देमाल त्याने जप्त केलेला आहे. प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदाराने तो जप्त मुद्‌देमालाचा मालक असल्याचे सांगितले आहे. तसेच अर्जदाराने दाखल केलेल्या जप्त मुद्‌देमालाच्या खरेदी पावतीवरून फिर्यादी जप्त मोबाईलचा कायदेशीर मालक दिसून येत आहे. आजपर्यंत इतर कोणीही जप्त मुदद्‌मालाबाबत कोणत्याही प्रकारे दावा केलेला नाही. जप्त मुद्‌देमालाचा कायदेशीर ताबेदार अर्जदार सकृतदर्शनी दिसत आहे. जप्त मुद्‌देमाल अर्जदारास परत देण्यास कोणतीही अडचण दिसत नाही. त्यामुळे अर्ज अटी व शर्तीवर मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ संबंधित तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यात येते की, पवई पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४८६/२०२० कलम ३९२ सह ३४ भा.द.वि. संहितामध्ये जप्त वस्तू सॅमसंग गॅलेक्सी नोट १० मोबाईल फोनचा अंतरिम ताबा अर्जदारास त्याने रू. ५०,०००/. (रू. पन्नास हजार फक्त) चा क्षतीपूर्ती बंधपत्र दिल्यावर खालील अटींवर त्यास देण्यात यावा.

अ अर्जदाराने जप्त मुदद्देमाल न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय हस्तांतरित करू नये अथवा त्यामध्ये बदल करू नये.

ब तपासी अंमलदार यांनी जप्त मुदद्देमालाचे छायाचित्रे सर्व बाजूंनी भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी काढावेत व त्याबाबतचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार करावा.

३ छायाचित्रे, पंचनामा व क्षतीपूर्ती बंधपत्र अन्वेषन अधिका—याने दोषारोपपत्रासोबत अथवा अंतिम अहवालासोबत दाखल करावेत.

Digitally signed by Bhagawat Tukaram Zirape
Date: 2021.01.25 16:04:36 +0530

दि.२५/०१/२०२१.

(भागवत तु. झिरपे)
महानगर दंडाधिकारी,
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.